महाराष्ट्र शासन
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
संचिका क्र. :- 218

जा. क्र. जिपछसं/शिक्षण/प्रावि-3/2024/6465/5136 दिनांक :- 12 / 08 /2024

प्रति,

**अध्यक्ष /सचिव/मुख्याध्यापक,**
सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, छत्रपती संभाजीनगर संचलित
योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदिर, वाळूज,एम.आय.डी.सी. परीसर, छत्रपती संभाजीनगर.

**विषय :- वैयक्तिक / सेवासातत्य मान्यता देणे बाबत. (श्री. करपे मनोज दत्तात्रय )**

**संदर्भ:-** 1.महाराष्ट्र खाजगी शाळाकर्मचारी ( सेवाशर्ती) नियम 1981
2.शासन निर्णय क्र पीआरई-2011/प्रक्र 177/ प्राशि-1 दि. 19 मार्च, 2012
3.शासन निर्णय क्र आरटीई-2010/प्रक्र 2010/प्रक्र 572/प्राशि-1 दि. 13 फेब्रुवारी, 2013
4.शासन निर्णय क्र एसएसएन-2015/प्रक्र 20/15 टीएनटी-2 दि.13 जुलै, 2016
5.शासन निर्णय क्र सीईटी-2015/ प्र.क्र. 149/ टीएनटी- 1 दिनांक 20 जून, 2018
6.शासन निर्णय क्र एसएसएन-2015/प्रक्र 20/टिएनटी-1 दिनांक 24.08.2018
7. आपला प्रस्ताव 15.07.2024 प्राप्त दि. 08.08.2024

वरील विषयी संदर्भ क्र. 7 अन्वये आपण, सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, छत्रपती संभाजीनगर संचलित योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदिर, वाळूज,एम.आय.डी.सी. परीसर, छत्रपती संभाजीनगर या शाळेमध्ये संस्थेने नियुक्ती केलेल्या श्री. करपे मनोज दत्तात्रय यांचा प्राथमिक पदवीधर शिक्षक म्हणुन वैयक्तिक / सेवासातत्य मान्यतेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

संदर्भ क्रमांक 3 वरील शासन निर्णय अन्वये दिनांक 13.02.2013 नंतर सहशिक्षक/ शिक्षणसेवकांना, शिक्षक पात्रता परिक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. (अल्पसंख्यांक व्यवस्थापनाच्या शाळासह) खालील प्राथमिक पदवीधर शिक्षक यांची नियुक्ती ही दिनांक 13.02.2013 नतंरची असुन, मुख्याध्यापक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानूसार व संदर्भ क्र 02 ते 06 वरील शासन निर्णयान्वये सहशिक्षक पदावर अंशत: अनुदानित तत्वावरील पदावर वैयक्तिक / सेवासातत्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | जात | जन्म दिनांक | प्रथम नेमणुक दिनांक | शैक्षणिक पात्रता | हुद्दा/पद | वेतन श्रेणी | विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. करपे मनोज दत्तात्रय | मराठा /खुला | 21.12.1994 | 01.12.2020 | बी.ए.बी.एड. /CTET | प्राथमिक पदवीधर शिक्षक | एस-14 (38600-122800) | श्री. करपे मनोज दत्तात्रय हे शिक्षक पात्रता परीक्षा CTET पात्र असल्यामुळे अंशत: अनुदानित तत्वारील रिक्त पदावर दि. 01.12.2020 ते 30.11.2022 या दोन वर्षापर्यंत परिविक्षाधीन कालावधीसाठी सहशिक्षक म्हणुन नियुक्तीस व दि. 01.12.2022 पासून अंशत: अनुदानित तत्वावर नियमीत सेवासातत्यास मान्यता देण्यात येते. |

उपरोक्त मान्यता महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियम 1981 व कलम (1) मधील तरतुदी नूसार संच मान्यतेच्या अधीन राहून देण्यात आलेली आहे. तसेच मान्यता दिलेले शिक्षक धरुन आपल्या शाळेतील शिक्षकांची संख्या या कार्यालयास निश्चित केलेल्या शिक्षक संख्येपेक्षा जास्त होता कामा नये. वरील मान्यता दिल्यामुळे आपल्या शाळेतील उपरोक्त पात्रतेची

कायम शिक्षक अतिरिक्त झालेले आढळुन आल्यास मान्यता रद्द केली जाईल. संबधिताच्या संस्थेने, मुख्याध्यापकाने दिलेल्या कागदी पुराव्याच्या अधारे मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी भविष्यात तफावत अथवा दिलेले कागद पत्रे खोटी तसेच शासन नियमाच्या विरुध्द आढळुन आल्यास व तक्रारी उद्भवल्यास व त्यामध्ये तथ्य निदर्शनास आल्यास सदर मान्यता रद्द करुन संस्था/ मुख्याध्यापक यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जयश्री चव्हाण)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर

**प्रतिलीपी**:-

1. अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक(प्राथमिक) छत्रपती संभाजीनगर.
2. संबंधितास, मुख्याध्यापक मार्फत.
3. निवडनस्ती.